(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९६] ३ एस. सी. आर. ४९२

**मासिपतला राघवुलु**

*- विरुद्ध -*

**दी रेव्हेन्यू डिव्हिजनल ऑफिसर, एल ए ओ, पेड्डापल्ली**

१५ मार्च १९९६

[के. रामास्वामी आणि जी. टी. नानावटी, न्यायमूर्ती]

*भूमिसंपादन अधिनियम, १८९४ :कलम ४(१).*

*भूमि संपादन - राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळासाठी भूमि संपादन - भूमि संपादन अधिकाऱ्याकडून नुकसानभरपाई @ रु. ३,०००/- प्रति एकर - दुय्यम न्यायधीशांद्वारे वाढ @ रु. ६,५००/- प्रति एकर - दुय्यम न्यायधीशांनी दिलेला आदेश उच्च न्यायालयाने कायम ठेवला - अपील-त्याच हेतूसाठी अधिग्रहित केलेल्या दुसर्या जमिनीच्या संदर्भात नुकसानभरपाई रु.८,०००/- प्रति एकर किंवा त्यापेक्षा कमी असल्यास ती मागे घेण्याचा महामंडळाचा धोरणात्मक निर्णय - असा निर्णय देण्यात आला की, अधिग्रहित केलेली जमीन लगतच्या क्षेत्रात असल्याने अशा जमिनीसाठी नुकसानभरपाई म्हणून रु. ८,०००/- एवढी निश्चित करण्यात आली - जमीनमालक १९८४ चा सुधारणा अधिनियम क्र. ६८ पूर्वी प्रचलित असलेल्या दरांवर नुकसान भरपाई आणि व्याज मिळण्याचा देखील हक्कदार होते.*

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ५०८६/१९९६.

ए. क्र. २१९६/१९८९ मधील आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने दि. १२/०२/१९९२ रोजीच्या निकाल आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी डी. प्रकाश रेड्डी आणि राणी छाब्रा.

उत्तरवादींसाठी जी. प्रभाकर आणि के. सी. दुआ.

न्यायालयाचा न्यायनिर्णय पुढीलप्रमाणे देण्यात आला :

हस्तक्षेप करण्यास अनुमत करण्यात आले.

अनुज्ञा मंजूर झाली.

आम्ही दोन्ही बाजूंच्या विद्वान अधिवक्तांचे म्हणणे ऐकले.

भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ४(१) अंतर्गत (थोडक्यात, 'अधिनियम') राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळासाठी मोठ्या प्रमाणात जमीन संपादन करण्याची अधिसूचना दि. २२ सप्टेंबर १९७९ रोजी प्रकाशित करण्यात आली.

भूमि संपादन अधिकाऱ्याने रु. ३,०००/- प्रति एकर नुकसान भरपाई निश्चित केली. निर्देशन केल्यावरून, विद्वान दुय्यम न्यायधीशांनी नुकसानभरपाई वाढवून रु.६,५००/- प्रति एकर एवढी केली. अपील केल्यावर, आंध्र प्रदेशच्या उच्च न्यायालयाने विद्वान दुय्म्म न्यायाधीशांनी पारित आदेश कायम ठेवला. सबब विशेष अनुज्ञेद्वारे हि अपील दाखल करण्यात आली. त्याच हेतूसाठी लिंगपूर हा पाडा असलेल्या मैदपल्ली गावातून जेव्हा दुसरी जमीन अधिग्रहित करण्यात आली होती, तेव्हा नुकसानभरपाई रु.८,०००/- पेक्षा कमी असल्याने स्वतः महामंडळाने याचिका मागे घेण्याचा निर्णय घेतला होता, यात वाद नाही. त्या आधारावर, उच्च न्यायालयाने अपील क्र. ८६९व ८७१/ १९८५ मध्ये रु. ८,४००/- एवढा बाजारभाव कायम केला. ज्या ठिकाणी जमिनीचे मूल्य रु.८,०००/- प्रति एकर आणि त्याहून कमी दराने निश्चित केले गेले होते, त्या अपीलांना मागे घेण्याचा धोरणात्मक निर्णय महामंडळाने ने स्वतः घेतला होता, ही वस्तुस्थिती लक्षात घेता आणि मैदपल्ली या मुख्य गावाच्या पाड्यात जमीन स्थित असल्याने, जे संलग्न गट आहेत, या जमिनीच्या संदर्भात देखील नुकसानभरपाई रु.८,०००/- प्रति एकर या दराने निश्चित केल्या जाईल.

त्यानुसार अपीलला वरील मर्यादेपर्यंत अनुमत करण्यात येत आहे. अपीलकर्ते १९८४ चा सुधारणा अधिनियम क्र. ६८ पूर्वी प्रचलित असलेल्या दरांवर नुकसान भरपाई आणि व्याज मिळण्याचा देखील हक्कदार आहेत.

टी. एन. ए

अपिल अनुमत करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित

राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय  हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता  विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."